# डॉ. महेंद्र वाघमारे अध्यक्षपदी



**डॉ. महेंद्र वाघमारे**

**रमणमळा, ता. ११ :** डॉ. महेंद्र बसाप्पा वाघमारे यांची शिवाजी विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र अभ्यास मंडळाच्या अध्यक्षपदी निवड झाली. निवडीचे पत्र कुलसचिव डॉ. विलास नांदिवडेकर यांनी त्यांना दिले. डॉ. वाघमारे यांचे प्राथमिक शिक्षण उमराणीतील जिल्हा परिषद शाळा, माध्यमिक शिक्षण जतमधील के.एम. हायस्कूल, तर उच्च माध्यमिक शिक्षण राजे रामराव महाविद्यालयात झाले. बी.एस्सी.-बॉटनी पदवीचे शिक्षण विलिंग्डन महाविद्यालयात, तर एम.एस्सी.-बॉटनी पदव्युतर पदवी शिवाजी विद्यापीठातून त्यांनी मिळवली. वसंतराव नाईक कॉलेजमधून बी.एड. केले. ते नेट उत्तीर्ण आहेत. सध्या ते न्यू कॉलेज येथे वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख म्हणून कार्यरत आहेत.

# शिवाजी विद्यापीठात आज संगीत-नाटक महोत्सव

## नाटककार संभाजी सावंत यांची उपस्थिती



कोल्हापूर, ता. ११ : शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागामार्फत उद्या (गुरुवारी) दुपारी साडेतीन वाजता संगीत-नाटक महोत्सवाचे आयोजन केले आहे. मुंबई येथील प्रसिद्ध नाटककार, दिग्दर्शक संभाजी सावंत यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्‌घाटन होणार आहे. मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे अध्यक्षस्थानी असतील.

महोत्सवाच्या पहिल्या सत्रात सायंकाळी चार ते साडेपाच या वेळेत संभाजी सावंत यांचे व्याख्यान होणार आहे. सायंकाळी साडेपाच ते सहा या वेळेमध्ये संगीत व नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थी 'तोच चंद्रमा नभात' या एकांकिकेचे सादरीकरण करणार आहेत. या एकांकिकेचे लेखन व दिग्दर्शन ज्ञानेश मुळे यांनी केले आहे. डॉ. संजय तोडकर यांचे नेपथ्य आहे. महोत्सवाच्या दुसऱ्या सत्रामध्ये सायंकाळी सहा ते आठ या वेळेमध्ये ग्वाल्हेर, जयपूर आणि आग्रा घराण्याचे प्रसिद्ध गायक डॉ. शशांक मक्तेदार (गोवा) यांचे गायन होणार आहे. यावेळी निखिल भगत (तबला) आणि अमित साळोखे (संवादिनी) यांची साथसंगत असेल. महोत्सवाचा सर्वांनी लाभ घ्यावा, असे आवाहन संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुख डॉ. अंजली निगवेकर यांनी केले आहे.

# शिवाजी विद्यापीठात उद्या संगीत-नाटक महोत्सवाचे आयोजन

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागामार्फत गुरुवारी (दि. १२) दुपारी साडेतीन वाजता संगीत व नाट्यशास्त्र विभागामध्ये संगीत-नाटक महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

मुंबई येथील प्रसिद्ध नाटककार, दिग्दर्शक संभाजी सावंत यांच्या हस्ते महोत्सवाचे उद्‌घाटन होणार आहे. यावेळी मराठी अधिविभागप्रमुख डॉ. रणधीर शिंदे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. प्रथम सत्रामध्ये दुपारी चार ते साडेपाच या कालावधीमध्ये संभाजी सावंत यांचे व्याख्यान होणार आहे. सायंकाळी साडेपाच ते सहा या वेळेमध्ये संगीत व नाट्यशास्त्र विभागातील विद्यार्थी 'तोच चंद्रमा नभात' या एकांकिकेचे सादरीकरण करणार आहेत. महोत्सवाच्या द्वितीय सत्रामध्ये सायंकाळी सहा ते रात्री आठ या वेळेमध्ये ग्वाल्हेर, जयपूर आणि आग्रा घराण्यांचे गायक डॉ. शशांक मक्तेदार यांचे गायन होणार आहे.

# ‘कुसुमाग्रज महाराष्ट्राचे कविनायक’

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

‘कवी कुसुमाग्रजांच्या एकुण वाङ्मयाचा पिंडधर्म हा कवित्वाचा असून त्यांच्या काव्यवृत्तीचा संचार समग्र साहित्यातून प्रकट झालेला आहे. विविध प्रकारच्या वाङ्मयातून उभा राहिलेला हा लेखक असून त्यांच्या विकसनशीलतेच्या खुणा त्यांच्या एकंदर वाङ्मयातून प्रकट होतात. ‘अनंताचे घर झाले जीवनाचे दार असे त्यांच्या वाङ्मयाचे केंद्र होते. असा हा महाराष्ट्राच्या समाजमनावर प्रभाव असणारा कविनायक होता,’ असे प्रतिपादन ज्येष्ठ समीक्षक डॉ. अविनाश सप्रे यांनी केले.



डॉ. अविनाश सप्रे

विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र सभागृहात कवी कुसुमाग्रजांच्या स्मृतिदिनानिमित्त ‘कवी कुसुमाग्रजांचे वाङ्मयीन व्यक्तिमत्त्व’ या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे होत्या.

प्रा. सप्रे म्हणाले, ‘कुसुमाग्रजांवर शेक्सपिअरच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव होता. त्यांची वाङ्मयीन प्रतिमा द्वंद्वात्मक स्वरूपाची होती. त्यांच्या दृष्टीत मानवतावाद, उदारमतवाद आणि आधुनिकतेचा प्रत्ययही येतो. कल्पनाशीलता हे त्यांच्या वाङ्मयाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य होते.’

मेघा पानसरे म्हणाल्या, ‘साहित्यिकांची निर्मिती आणि भूमिका ही काळाला नेहमी पथदर्शक राहते. कुसुमाग्रजांची कविता काळाशी लढण्याचे बळ देते, त्यामुळे वर्तमानकाळाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या शब्दांचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे.’ यावेळी प्रा. लक्ष्मीनारायण तरोडी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ. सयाजीराव गायकवाड यांनी आभार मानले.

## दिलीप ढवळे : शिवाजी विद्यापीठातील राष्ट्रीय परिषद

# रसायनशास्त्र, मटेरियल सायन्सने एकत्र यावे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** रसायनशास्त्र आणि मटेरियल सायन्स यांनी एकत्र येऊन काम केल्यास त्यातून समाजातील विविध समस्यांचे सहजपणे निराकरण करता येईल. प्लास्टिकचा वापर टाळून पर्यावरणपूरक गोष्टींचा अंगीकार करावा, असे प्रतिपादन सावित्रीबाई फुले विद्यापीठ पुणे येथील रसायनशास्त्राचे प्रा. डॉ. दिलीप ढवळे यांनी शुक्रवारी येथे केले.

शिवाजी विद्यापीठातील रसायनशास्त्र विभागातर्फे आयोजित 'इमरजिंग ट्रेण्डस् इन केमिकल एण्ड मटेरियल सायन्सेस' या विषयावरील राष्ट्रीय परिषदेच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. पी. एस. पाटील होते. पर्यावरणपूरक संशोधन करणे हे शास्त्रज्ञांचे ध्येय असावे, असे प्रा. पाटील यांनी सांगितले. विभागप्रमुख प्रा. जी. एस. गोकावी यांनी रसायनशास्त्र विभागातील संशोधनाची माहिती दिली. या परिषदेत ग्रीन केमिस्ट्री, नॅनो टेक्नॉलॉजी, पर्यावरणशास्त्र, औषध निर्माण शास्त्र, पॉलिमर सायन्स, बायो टेक्नालॉजी आदी विषयांवर व्याख्याने, संशोधकांचे शोधनिबंध सादर झाले.

यावेळी डॉ. एस. एन. तायडे, राहुल माने, आदी उपस्थित होते. के. एम. गरडकर यांनी स्वागत केले. एस. पी. हांगीरीकर यांनी आभार मानले. या परिषदेत दोनशेहून अधिक संशोधक, विद्यार्थी सहभागी झाले आहेत.



कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या रसायनशास्त्र विभागातील परिषदेत प्रा. दिलीप ढवळे यांच्या हस्ते स्मरणिकेचे प्रकाशन करण्यात आले. यावेळी के. एम. गरडकर, पी. एस. पाटील, जी. एस. गोकावी, आदी उपस्थित होते.

# कुसुमाग्रज महाराष्ट्राचे कविनायक

## डॉ. अविनाश सप्रे ; कुसुमाग्रज स्मृतिदिन व्याख्यानमाला

**सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. ११ : कवी कुसुमाग्रजांच्या एकूण वाङमयाचा पिंडधर्म हा कवित्वाचा असून त्यांच्या काव्यवृत्तीचा संचार समग्र साहित्यातून प्रकट झालेला आहे. विविध प्रकारच्या वाङमयातून उभा राहिलेला हा लेखक असून त्यांच्या विकसनशीलतेच्या खुणा त्यांच्या एकंदर वाङमयातून प्रकट होतात, असे मत ज्येष्ठ समीक्षक डॉ. अविनाश सप्रे यांनी व्यक्त केले.



**कोल्हापूर : कवी कुसुमाग्रज व्याख्यानमालेत बोलताना डॉ. अविनाश सप्रे. शेजारी डॉ. मेघा पानसरे, डॉ. रणधीर शिंदे आदी.**

शिवाजी विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र सभागृहात कवी कुसुमाग्रजांच्या स्मृतिदिनानिमित्त आयोजित 'कवी कुसुमाग्रजांचे वाङमयीन व्यक्तिमत्त्व' या विषयावर आयोजित व्याख्यानात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी विदेशी भाषा विभागाच्या प्रमुख डॉ. मेघा पानसरे होत्या.

प्रा. डॉ. सप्रे पुढे म्हणाले, ''कुसुमाग्रजांवर शेक्सपिअरच्या व्यक्तिमत्वाचा प्रभाव होता. त्यांची वाङःमयीन प्रतिमा ही द्वंद्वात्मक स्वरुपाची होती. स्वतःच्या वाङःमयीन व्यक्तिमत्त्वाशी प्रामाणिक राहून कुसुमाग्रजांनी वस्तुनिष्ठ जीवनदृष्टीतून लेखन केले. त्यातून त्यांची दृष्टी अभिजातवादाकडे झुकलेली होती. त्यांच्या दृष्टीत मानवतावाद, उदारमतवाद आणि आधुनिकतेचा प्रत्ययही येतो.''

डॉ. मेघा पानसरे म्हणाल्या, ''साहित्यिकांची निर्मिती आणि भूमिका ही काळाला नेहमी पथदर्शक राहते. कुसुमाग्रजांची कविता काळाशी लढण्याचे बळ देते त्यामुळे वर्तमान काळाच्या पार्श्वभूमीवर त्यांच्या शब्दांचे महत्त्व समजून घेणे आवश्यक आहे.'' यावेळी प्रा. लक्ष्मीनारायण तरोडी यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. डॉ. रणधीर शिंदे यांनी प्रास्ताविक केले. सुश्मिता खुटाळे यांनी सूत्रसंचालन केले. डॉ.सयाजीराव गायकवाड यांनी आभार मानले. प्रा. डॉ. रघुनाथ कडाकणे, अनाधी खासबागदार, डॉ. विजया वाडकर आदी उपस्थित होते.